नागपूर महानगरपालिका, नागपूर

(नगर रचना विभाग)

श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत, बी ए सी विंग, तिसरा माळा, महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर–440001

फॅक्स क्र. 0712 –2561584, वेबसाईट – www.nmcnagpur.gov.in

जा.क्र.मनपाना/नरवि/ अंतिम मंजुरी/14 दिनांक:– 13/03/2018

प्रति,

मे. रचना कंस्ट्रक्शन

तर्फे श्री. शिशीर दिवटे, भागीदार

'लोटस' बिल्डींग, चौथा माळा, वेट हायकोर्ट रोड, धरमपेठ, नागपूर

विषय :– मौजा – चिंचभुवन, ता. नागपूर, जि. नागपूर, खसरा क्र. 144/2/2, 145/1, 145/6, 145/7, 145/2, 178/1, 178/2, 178/3/2, 177/1, 177/2, 181/1/2, 181/2,/1 आराजी 1,01,858.19 चौ.मी. जागेवरील रहिवासी प्रयोजनार्थ अभिन्यास नकाशांना अंतिम मंजुरी बाबत.

संदर्भ :– 1) नकाशा क्र. 20/चिंचभुवन/टी.पी./सुधारीत लेआऊट प्लान दि. 13.10.2016.

2) या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/नरवि/अंतिम/28, दि. 10.02.2017.

3) मुख्य अधिकारी, नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचे पत्र क्र. नामं/मुअ/20% चिंचभुवन/4434/ज.शा./2017 दि. 01.08.2017.

4) आपले या कार्यालयात असलेले पत्र 1018, दि. 05.08.2017.

5) या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/नरवि/अभिन्यास तत्वतः मंजुरी/11 दि. 23.01.2018.

6) नगर भुमापन विभागाकडील मोजणी मामला क्र. 27/2018, दि. 16.02.2018 अन्वये प्राप्त आखणी नकाशा.

7) आपले या कार्यालयास असलेले दि. 05.03.2018 रोजीचे पत्र.

मौजा – चिंचभुवन, ता. नागपूर, जि. नागपूर, येथील खसरा क्र. 144/2/2, 145/1, 145/6, 145/7, 145/2, 178/1, 178/2, 178/3/2, 177/1, 177/2, 181/1/2, 181/2,/1 न.भु.क्र. 365, 369, 514, 517 व 516 एकुण आराजी 1,01,858.19 चौ.मी. येथील जागेवर सादर केलेल्या सुधारित अभिन्यास नकाशाला खालील शर्ती व अटींच्या अधिन राहुन अंतिम मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

1. आपण नागपूर महानगरपालिकेसोबत दि. 28.12.2015 रोजी विकास कामांकरिता केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती बंधनकारक अरातील.
2. अंतिम अभिन्यास नकाशात दर्शविलेल्या खुल्या जागेला (Recreational Open Space) तिन महिन्याचे आत स्व खर्चाने कुंपन भिंतीचे बांधकाम करून महानगरपालिकेला विना मुल्य हस्तांतरीत करावी लागेल.
3. अप्पर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, नागरी जमिन कमाल धारणा नागपूर कार्यालयाचे आदेश क्र. ATP/ULC/TD(682)/2006/460 दि. 27.03.2006 नुसार भुखंडाचे एकत्रिकरण करून लोवर बहुमजलीचे इमारतीचे बांधकाम करण्याबाबतचे प.क्र. क. कली/यु.एल.सी./कावि 676/2012 दि. 06.08.2012 मधील अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील

4. या कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/नरवि/अंतिम 28, दि. 10.02.2017 अन्वये या पूर्वी मंजुर करण्यात आलेला अंतिग अभिन्यास नकाशा रद्द समजण्यात यावा.
5. अभिन्यासातील अंतर्गत विकास कामे उदा. पिण्याच्या पाईप लाईन्स, सिवर लाईन्स, पावसाळी नाल्या, रस्त्यावरील विद्युतीकरण, मोकळया जागांचे समतलीकरण व कंपाऊंड भिंत बांधणे इत्यादीबाबत नागपूर महानगरपालिकेकडे आराखडे सादर करून मंजुर करून घ्यावे लागतील व त्याप्रमाणे नागपूर महानगरपालिकेकडे आराखडे सादर करून मंजुर करून घ्यावे लागतील व त्याप्रमाणे अभिन्यासाचा विकास करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.
6. दि. 28.12.2015 रोजीच्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार अभिन्यासातील विकास कामांच्या प्रमाणात भुखंड बांधकामाकरीता मुक्त करण्यात येईल.
7. सदर अभिन्यासातील भुखंडावरील बांधकामाचे क्षेत्र 20000.00 चौ.मी. पेक्षा असल्यास पर्यावरण विभागाचे ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक राहील.
8. विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. 13.6 अन्वये सेवा सुविधा क्षेत्र पुरवावे लागेल.
9. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमाचे कलम 124 ब नुसार विकास शुल्क प्रस्तावित ईमारत नकाशा मंजुरीच्या वेळेस वसुल केल्या जातील.
10. शासन निर्णय क्र. TBP-4312/CR-45/2012(1) UD-11, dt. 08.11.2013 नुसार अभिन्यास नकाशामध्ये दर्शविण्यात आलेली 20% जागा परवडणाऱ्या घरांची योजना राबविण्याकरिता नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ, (MHADA) या प्राधिकरणास विनामूल्य हस्तांतरित करण्यात यावी व या करिता आवश्यक ती कार्यवाही आपण म्हाडा, नागपूर या कार्यालयाशी संपर्क साधून करण्यात यावी.
11. महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन (NMRC) मधील असलेल्या तरतुदी अभिन्यास नकाशातील प्रस्तावित ईमारतींना लागू असून त्यानुसार मंजुरी प्राप्त करून घ्यावी लागेल.
12. अकृषक आदेशातील अटी व शर्ती विकासकास बंधनकारक असतील.

या पत्रानुसार सदर अभिन्यासासंबंधी काम करतांना महाराष्ट्र म्युनिसिपल कॉर्पोरेशन ॲक्ट, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना, अधिनियम 1966 अगर त्यास अनुसरून केलेले नियम व पोट–नियम यांचा भंग होत आहे असे मनपाच्या निदर्शनास आल्यास सदरचे संमतीपत्र रद्द करण्याचा अधिकार नागपूर महानगरपालिकेस राहील.

सहाय्यक संचालक
नगर रचना विभाग
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपीः–

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ, आम्रपाली भवन जवळ, सिव्हील लाईन्स, नागपूर